विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत.
(श्री.अर्जुन लक्ष्मण साबळे ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पिपळगाव पिसा तालुका श्रीगोंदा)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग/ग्रांप३/ई.क्र.११८५६१७
दिनांक २८/०४/२०२५

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१०६०९७८/२०२५ दिनांक २६/०३/२०२५

२. श्री. अर्जुन लक्ष्मण साबळे ग्रामपंचायत अधिकारी यांचा प्राप्त खुलासा दिनांक ११/०४/२०२५

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)

ज्या अर्थी श्री.अर्जुन लक्ष्मण साबळे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत पिंपळगाव पिसा तालुका श्रीगोंदा यांचे गैरवर्तन / अपहार प्रकरणी त्यांचे विरुध्द संदर्भ क्रमांक ०१ अन्वये एकूण ०४ दोषारोप ठेवून ज्ञापन बजावण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये श्री.साबळे यांनी त्यांना देण्यात आलेल्या दोषारोपांचा खुलासा कार्यालयास सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप क्रमांक ०१ ते ०४ बाबत त्यांनी कोणतेही गैरवर्तन केले नसल्याचे खुलाश्यात नमुद केलेले आहे. सबब त्यांनी दोषारोपातील कोणतेही आरोप मान्य केलेले नसल्याने, दोषारोप प्रकरणी श्री.साबळे यांना म्हणणे सादर करण्याची संधी देणे, न्याय हक्काचे दृष्टीने सर्व आरोपांबाबत विभागीय चौकशी करणे ,आवश्यक असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार श्री.अर्जुन लक्ष्मण साबळे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत पिंपळगाव पिसा तालुका श्रीगोंदा यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोप क्रमांक ०१ ते ०४ संदर्भात विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

या आदेशान्वये सदर विभागीय चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी म्हणून सहा. आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे वतीने श्री.संजय अर्जून वाघ, विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती श्रीगोंदा यांची नियुक्ती करणेत येत आहे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याच प्रमाणे श्री.साबळे यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे याचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्वकामकाज नियमाप्रमाणे करावे. व होणा-या प्रत्येक सुनावणीस सादरकर्ता अधिकारी यांनी

उपस्थीत रहावे. प्रकरणी या कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादर कर्ता यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी . या विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०४२८०६००६९ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 28-04-2025 13:48:36
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१) सहा.आयुक्त, (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक

२/- सोबत श्री.अर्जुन लक्ष्मण साबळे, ग्रामपंचायत अधिकारी, यांचे गैरवर्तनाबाबतचे पुरावे व दस्तऐवज समवेत जोडले आहे.

२) श्री.संजय अर्जुन वाघ विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती श्रीगोंदा .

प्रत :- श्री.अर्जुन लक्ष्मण साबळे , ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा.
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

२/- सोबतचा आदेश श्री.अर्जुन लक्ष्मण साबळे, ग्रामपंचायत अधिकारी, यांना बजावून तो मिळालेबाबतची पोहच या कार्यालयास सादर करावी.

(स्वाक्षरीत /-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर